# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.3849/शि.वि./2015
दि.16/03/2015

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– शिष्यवृत्ती परीक्षा 22 मार्च 2015 बाबत.**

**संदर्भ :– शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र.जिपना/शिक्षण/प्राथ./शिष्य/2177/15 दि. 13.03.2015.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पूणे यांचेमार्फत घेण्यात येणारी इयत्ता 4 थी व 7 वी ची शिष्यवृत्ती परीक्षा रविवार 22 मार्च 2015 ला होणार आहे याबाबत केंद्र संचालकांना संदर्भिय पत्राव्दारे सूचित करण्यात आले असून उपरोक्त परीक्षेबाबत, विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्रबाबत, काही अडचणी असल्यास परीक्षेच्या अगोदरच संबंधित केंद्र संचालकांशी संपर्क साधावा व आपल्या समस्यांचे निराकरण करून घ्यावे.

उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक सोबत संलग्न केले असून त्याचे अवलोकन करावे. परीक्षा केंद्रावर सकाळी 10.00 वाजता विद्यार्थ्यांसमवेत हजर रहावे. विद्यार्थ्यांना दिवसभर परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे असल्यामुळे जेवणाचा डबा व पाण्याची बॉटल सोबत घेण्याबाबत सूचना देण्यात याव्या. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर सुरक्षित ने–आण करण्याची जबाबदारी आपणांवर असून याकरीता आवश्यक शिक्षकांना सूचना द्याव्यात.

आपल्या शाळेत उपरोक्त शिष्यवृत्ती परीक्षा केंद्र असल्यास परीक्षेसाठी आवश्यक वर्गखोल्या सर्व भौतिक सुविधांसह उपलब्ध करून द्याव्यात. तसेच परीक्षा सुरळीत पार पडण्याकरीता सहकार्य करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

# विभाग I

## परीक्षेचे वेळापत्रक

**१. पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, शासकिय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा.** 4 थी

**रविवार दि.२२ मार्च २०१५**

| | पेपर | वेळ | एकूण गुण |
|---|---|---|---|
| १. | **भाषा व इंग्रजी**<br>अ) प्रथम भाषा ७० गुण + इंग्रजी भाषा ३० गुण<br>(इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त)<br>ब) इंग्रजी माध्यमासाठी इंग्रजी - १०० गुण | सकाळी ११ ते १२ | १०० |
| २. | **गणित व परिसर अभ्यास भाग - I**<br>गणित ७० गुण + परिसर अभ्यास भाग I - ३० गुण | दुपारी १ ते २ | १०० |
| ३. | **बुध्दिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग II**<br>बुध्दिमत्ता चाचणी ७० गुण + परिसर अभ्यास भागII - ३० गुण | दुपारी ३ ते ४ | १०० |

वरील सर्व परीक्षा एकत्रितच घेतल्या जाणार असून या परीक्षेमधून निकषानुसार/गुणवत्तेनुसार संबंधित विद्यानिकेतनमध्ये प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या शिफारशी केल्या जातील. तसेच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्हता दिली जाईल.

**२. माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा :- रविवार दिनांक २२ मार्च २०१५** 7 वी

| | पेपर | वेळ | एकूण गुण |
|---|---|---|---|
| १. | **भाषा व इंग्रजी**<br>अ) प्रथम भाषा ८० गुण + इंग्रजी भाषा २० गुण<br>(इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त)<br>ब) इंग्रजी माध्यमासाठी<br>इंग्रजी - ८० गुण + मराठी (द्वितीय भाषा) २० गुण | सकाळी ११ ते १२ | १०० |
| २. | **गणित व सामाजिक शास्त्रे**<br>गणित ७० गुण + सामाजिक शास्त्रे ३० गुण | दुपारी १ ते २ | १०० |
| ३. | **बुध्दिमत्ता चाचणी व सामान्य विज्ञान**<br>बुध्दिमत्ता चाचणी ७० गुण + सामान्य विज्ञान ३० गुण | दुपारी ३ ते ४ | १०० |

दोन्ही परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ३० गुण व तीनही पेपरमध्ये मिळून एकूण १२० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. पूर्व माध्यमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेच्या तिन्ही प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाचे असणार आहेत.